आज़ादी का अमृत महोत्सव

# कार्यालय, नगर परिषद कामठी,

जिल्हा नागपुर 441002

Phone:07109299902, Fax:07109286665, email :-chiefofficermckamptee@gmail.com

क्रमांक / नपका / स्व.वि / 1292 / 2026 दिनांक: 15 / 05 / 2026

## ई-निविदा सूचना

**कामाचे नाव :** माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेतून हरित क्षेत्र वाढविणे करिता नगर परिषद कामठी क्षेत्रात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन, वृक्ष नर्सरी, विहीर पुनरुज्जीवत करणे.

मुख्याधिकारी, नगरपरिषद कामठी यांचे वतीने सन २०२६-२७ ह्या आर्थिक वर्षात नगर परिषद कामठी क्षेत्रात माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेतून हरित क्षेत्र वाढविणे व पर्यावरण पूरक इतर उपाय योजणा करणेकरिता ई-निविदा मागविण्यात येत असून अधिकृत नोंदणी धारकांनी खालील नमूद तारखेस आपल्या ई-निविदा सादर कराव्यात. निविदेचा विस्तृत नमुना अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ......../........./२०२६ पासून पाहण्यास उपलब्ध आहे. कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **ई-निविदेचा प्रसिध्द तपशील** | | |
|---|---|---|
| १. | ई-निविदा प्रसिद्धी दिनांक | दि. 15 / 05 /२०२६ सकाळी १०.०० वाजेपासून |
| २. | निविदा दरपत्रक सदर करण्याचा दिनांक | दि. 15 / 05 /२०२६ सकाळी १०.०० वाजेपासून ते दि. 22 / 05 /२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ३. | निविदा उघडण्याचा दिनांक | दि. 25 / 05 /२०२६ दुपारी ३.०० वाजता किवा सोयीनुसार |

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म रक्कम | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेतून हरित क्षेत्र वाढविणे करिता नगर परिषद कामठी क्षेत्रात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणे. | ३००० /- | ३३ ,२६० /- |
| 2 | माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेतून हरित क्षेत्र वाढविणे करिता नगर परिषद कामठी क्षेत्रात वृक्ष नर्सरी तयार करणे. | ५०० /- | ३००० /- |
| 3 | माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेतून हरित क्षेत्र वाढविणे करिता नगर परिषद कामठी क्षेत्रातील विहीर पुनरुज्जीवत करणे. | ५०० /- | १००० /- |

AnyScanner

कामाबाबतचा संपुर्ण तपशील व निवेदेतील अटी व शर्ती वरीलप्रमाणे स्वास्थ विभाग, नगर परिषद कामठी येथे पहावयास मिळेल.
निवेदेतील सर्व अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांनी राखुन ठेवले आहे.

(अजय अग्रवाल)
अध्यक्ष,
नगरपरिषद कामठी, नागपूर.

(विनोद जाधव)
मुख्याधिकारी, गट-अ (निवडश्रेणी),
नगरपरिषद कामठी, नागपूर.

AnyScanner

# निविदा अटी शर्ती

**तांत्रिक बोली** :- निविदा धारकाने तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालील प्रमाणे कागद पत्रे दिलेल्या वेळेमध्ये सादर करणे आवश्यक आहे.

1. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
2. UDYAM Adhar/MSME नोंदणी प्रमाणपत्र
3. पॅनकार्ड
4. जि. एस. टी. नोंदणी प्रमाणपत्र
5. **EPF** रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र
6. **ESIC** रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र
7. आयकर मागील 3 वर्षाचा
8. माझी वसुंधरा अंतर्गत वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन व इतर कामे केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र.
9. निविदेमध्ये नगर परिषदच्या कोणत्याही नगर सेवकाचा हिस्सा / हितसंबंध किंवा भागीदारी नसल्याबाबत परिशिष्ठ अ मधील प्रतिज्ञापत्र रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर द्यावे लागेल.
10. कुठल्याही शासकीय/निमशासकीय संस्थेने/ कार्यालयाने काळ्या यादीत न टाकल्याचे स्वघोषणापत्र व सर्व कागदपत्रे खरी जोडल्याबाबतचे स्व:घोषणापत्र रु. 100/- च्या मुद्रांक पेपरवर देणे बंधनकारक राहील.

**आर्थिक बोली:-** विहित प्रपत्रातील निविदा किमंत दिलेल्या प्रपत्रात सादर करावे. दर हे सर्व करासहित नमुद करावेत. नगर परिषद कामठी इतर कुठलाही अतिरिक्त खर्च देणार नाही.

निविदा उघडणे, स्वीकारणे अथवा फेटाळणे:-

1. बोली क्र. 1 मधील आवश्यक कागदपत्रांची पुर्तता होत नसल्यास, बोली क्र. 2 उघडण्यात येणार नाही. तसेच याबबत मुख्य अधिकारी नगर परिषद कामठी यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.
2. निविदे सोबत अनामत रक्कम न भरल्यास किंवा सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रामध्ये खरेपणा न आढळल्यास, निविदा सादर करताना भ्रष्ट व कपट मार्गाचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास, सशर्तनिविदा सादर केल्यास, नगर परिषदेने नमुद केलेली पात्रता पुर्ण करू न शकल्यास, अशा परिस्थितीत निविदा फेटाळण्यात येतील.
3. निविदा सर्वसाधारण व शक्यतो वाजवी व कमीत कमी दराची नगर परिषदेच्या मान्यते नंतर स्विकारणेत येईल किंवा कारणे नमुद करून अथवा सबळ कारणास्तव कमी दराची निविदा / उच्चतम दराची निविदा मंजुर करण्यात अधिकार नगर परिषदेस राहील.
4. कोणतेही कारण नमुद करून अथवा असे कारण न देता आलेल्या निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगर परिषद राखुन ठेवलेला आहे.

(विनोद जाधव)
मुख्याधिकारी, गट-अ (निवडश्रेणी),
नगरपरिषद कामठी, नागपूर

AnyScanner

## कामाच्या अटी शर्ती

1. नगर परिषद कामठी क्षेत्रात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणेचे काम संबंधित अधिकारी यांनी दिलेल्या वेळेत पूर्ण करणे निविदा धारकाला बंधन कारक राहील.
2. आपण सादर केलेले बिलातून सर्व शासकीय कर कपात करण्यात येईल.
3. कार्यादेश घेण्यापूर्वी 2 टक्के सुरक्षा राशीचे एफ. डी. आर. किंवा बँक गॅरंटीदेणे बंधकारक आहे.
4. कार्यादेशापासून ठरलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास प्रति दिवस रुपये 500/- किंवा त्यापेक्षा जास्त दंड आकारण्यात येईल.
5. बाजार दरातील तफावतीनुसार वाढीव दर अनुज्ञेय राहणार नाही.
6. प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १० टक्के कमी दराचा असेल तर कंत्राटदाराने निविदाधीन किमतीच्या १ टक्के तसेच १० ते १४ टक्के कमी दाराची असेल तर निविदाधीन किमतीच्या ५ टक्के व १५ टक्केच्या वर कमी दराची निविदा असेल तर प्रति २ टक्के प्रमाणे एवढ्या धनाकर्ष (DD) परफॉर्मस सिक्युरिटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र. २ मध्ये सादर करावा तसेच लिफाफा क्रमांक २ उघड्यानंतर ७ दिवसात नगर पंचायत कार्यालयामध्ये कमी दराची मूळ धनाकर्ष (DD) सादर करणे बंधनकारक आहे.
7. नगर परिषद कामठी क्षेत्रात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणेचे काम करण्याकरिता आवश्यक असणारे सर्व साहित्य नगर परिषदने दिलेल्या IS व भारतीय मानांकनानुसार तसेच अंदाजपत्रकानुसार असणे आवश्यक राहील.
8. यशस्वी निविदाधारकाने नगर परिषद कामठी क्षेत्रात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणेचे काम करतांना लागणारे साहित्य पुरवठ्याच्या जागेपासून वाहतूक करून नगर परिषद कामठी ला पुरविणे बंधन कारक राहील. नगर परिषद कामठी क्षेत्रात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणेचे काम करतांना लागणारे साहित्य पुरवठ्याच्या जागेपासून वाहतुकीचे अंतर जास्त असल्यास, त्या करिता नगर परिषद मार्फत अतिरिक्त खर्च दिल्या जाणार नाही.
9. नगर परिषद कामठी क्षेत्रात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणेचे काम करतांना लागणारे साहित्य पुरवठा करण्याकरिता व सदरचे काम करण्याकरिता निविदाधार्काने सादर केलेल्या व मंजुर केलेल्या दरात काम करतांना त्यात काही फेरबदल असल्यास त्यास सर्वस्वी निविदाधारक जबाबदार राहील.
10. निविदाधार्काने सादर केलेल्या व मंजुर केलेल्या दरात/ किंमतीत वाढ झाल्यास त्यास सर्वस्वी निविदाधारक जबाबदार राहील.
11. नगर परिषद कामठी क्षेत्रात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणेचे काम करतांना लागणारे साहित्य पुरवठा करण्याकरिता व नगर परिषद कामठी क्षेत्रात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणेचे काम करण्याकरिता लागणाऱ्या साहित्य स्पेसिफिकेशन पुर्व परवानगी शिवाय बदल करू नये, तसेच प्रत्यक्ष खर्च हा दिलेल्या रक्कमेपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी. तथापी काही अपरिहार्य कारणास्तव मोठे बदल करावे लागल्यास व खर्च वाढल्यास नगर परिषद कार्यालयाला पुर्व सुचना देणे, निविदाधारकला बंधनकारक राहील.

AnyScanner

12. नगर परिषद कार्यालयातर्फे करण्यात आलेल्या दुरुस्त्या ग्राह्य धरण्यात याव्यात.
13. शासना कडून निर्गमित सर्व मार्गदर्शन तत्वे/ परिपत्रकांचे पालन करणे निविदाधारकला बंधनकारक राहील.
14. नगर परिषद कामठी क्षेत्रात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणेचे काम करतांना लागणारे साहित्य पुरवठा करण्याकरिता व नगर परिषद कामठी क्षेत्रात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणेचे काम करण्याकरिता सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व आवश्यक उपाय योजना करणे निविदाधारकला बंधनकारक राहील.
15. निधीच्या उपलब्धते नुसार सदर कामाचे भुगतान करण्यात येईल. बिलचे भुगतान देण्यास उशिर झाले तर निविदाधारक कोर्टात दाद मागणार नाही.
16. बिल सादर करतेवेळीस निविदाधारकाला पुरविण्यात आलेल्या साहित्याचे स्पेसिफिकेशन सादर करणे बंधनकारक राहील.
17. सदर काम करतांना कोणत्याही प्रकारचे अपघात घडल्यास याला सर्वस्व जवाबदारी निविदाधारकाची राहील.
18. सदर काम करतांना नगर परिषद कामठी कार्यालयामार्फत कुठलेही वाहने, साहित्य, कर्मचारी पुरवठा केले जाणार नाही.
19. प्रस्तावित अंदाजपत्रकातील कामासाठी वापरावयाचे साहित्य जसे सीमेंट, स्टील, वाळू, खडी, विटा इ. साहित्याची तपासणी शासन मान्यता प्राप्त संस्थेकडून (अभियांत्रिकी/तंत्रनिकेतन महाविद्यालय) करून घेण्यात यावी व योग्य असल्याची खात्री करण्यात यावी. सदर तपासणीचे निष्कर्ष जतन करून ठेवण्यात यावेत. तसेच प्रत्यक्ष कामाचे अंमलबजावणी दरम्यान वेळोवेळी त्रयस्थ यंत्रणे मार्फत (Third party inspection) तपासणी करून घ्यावी व त्याबाबतचे अहवाल जतन ठेवण्यात यावेत.
20. सदरचे काम कार्यान्वयन करणे त्याची देखरेख करून कामाची गुणवत्ता व दर्जा योग्य राखण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
21. सदर कामात पाईप व इतर साहित्य गुणवत्ता प्राप्त वापरण्यात यावे.
22. सदर काम केल्यानंतर, सदर साहित्याचे निरीक्षण केल्यानंतर व ते योग्य असल्याचे आढळल्या नंतरच बिलाचे भुगतान करण्यात येईल.
23. बिल सादर करतेवेळीस निविदाधारकाला पुरवठा केलेल्या सर्व साहित्याची यादी, कामाचा अहवाल फोटो सहित सादर करणे बंधनकारक राहील.
24. सदर निविदाधारक व्दारे काम करते वेळेस कोणत्याही प्रकारचे वादविवाद किंवा अप्रिय घटना घडल्यास याला निविदाधारक स्वतः जवाबदार राहील.
25. पर्यावरणाचे दृष्टीने वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणे इत्यादी उपाययोजना करणे निविदाधारकला बंधनकारक राहील.

SCAN AnyScanner

26. विद्यमान काम व प्रस्तावित कामे यांची तांत्रिक बाजू तपासून सांगड घालणे निविदाधारकला बंधनकारक राहील.

27. काम सुरू करण्यापूर्वी, प्रगती पथावर असतांना व काम पूर्ण झाल्यानंतर कामाची geo-tag छायाचित्रे घेऊन जतन करून ठेवावी.

28. प्रस्तावित कामाकरिता आवश्यक पाणी पुरवठा व वीज पुरवठा बाबतची सर्व व्यवस्था करण्याच जबाबदारी निविदाधारकाची राहील.

29. सदर कामाकरिता आवश्यकतेनुसार सुपरवाईजर असणे बंधनकारक आहे.

30. यशस्वी निविदाधारकास या कामा बाबत नियमानुसार स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

31. सदर प्रकरणी कार्यवाही /कंत्राट चालू असंतांना कोणत्याही स्तरावरील न्यायालयाने कामास स्थगिती दिल्यास त्यानुसार कार्यवाही करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. या करिता नगरपरिषद जबाबदार राहणार नाही व तसेच कंत्राटदाराला त्या कालावधीत कामाचे बिल सादर करण्याचे किंवा रक्कम मागण्याचा अधिकार राहणार नाही.

32. कामा संबंधित कंत्राटदार व नगर परिषद यांच्यात वाद उत्पन्न झाल्यास याबाबत चर्चा करून मुख्याधिकारी, नगरपरिषद कामठी जो निर्णय देतील ते कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

33. ठरविल्याप्रमाणे काम होत नसल्यास, अनियमितता आढळल्यास कार्यवाही करून करार संपुष्ठात आणण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगरपरिषद कामठी यांच्या कडे राहील.

34. निविदा स्वीकारणे किंवा कोणतेही अथवा सर्वच निविदा रद्द करण्याचे अधिकारी मुख्याधिकारी, नगरपरिषद कामठी यांच्या कडे सुरक्षित राहतील.

35. निवेदी संबंधी सर्व अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांनी राखुन ठेवले आहे.

(विनोद जाधव)
मुख्याधिकारी, गट-अ (निवडश्रेणी),
नगरपरिषद कामठी, नागपूर

SCAN AnyScanner

# परिशिष्ट – अ

## प्रतिज्ञा - पत्र

मी / आम्ही या व्दारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 16(1) (आय) व कलम 44 (1)(ब) तरतुदीच्या ज्या खाली उदधृत केलेल्या आहेत, माहिती आहे आणि गंभीरपणे नमुद करतो की, नगरपालिकेशी किंवा नगर पालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदेमध्ये नगर परिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमचेशी भागीदारी नाही.

कलम 16(1) (आय) :- यापुढे तरतुद केलेली असेल त्या व्यतिरिक्त नगर पालिकेच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही हित संबंध असेल.

कलम 44 (1)(ब) – पालिका सदस्य म्हणुन किंवा नगर पालिकेच्या कोणतेही समिताच्या सदस्य म्हणुन ज्या कोणतेही बाबतीत कलम 16 चे पोटकलम(3), खंड (अ),(ब),(क),(इ) व (ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्यांचा भागीदारीच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल माग अशा हिश्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असे – किंवा जीत अशीलाच्या, प्रकर्त्याचा किंवा इतर व्यक्तीच्या वतीने दृष्ट्या त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

निविदा धारकाचे नाव :-

पत्ता :-

निविदाधारकाची स्वाक्षरी

Signature Not Verified

Digitally signed by SATISH VINAYAK URKUDE
Date: 2026.05.15 19:45:11 IST
Location: Maharashtra-MH

AnyScanner